Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016

# जळगाव शहरातील शिवाजीनगर, गेंदालाल मिल व कांचननगर परिसरातील महिलांवरील कौटुंबिक हिंसाचाराची चिकित्सा.

डॉ. शांताराम बडगुजर,
कुलसचिव,
एस. एन्. डी. टी. महीला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई – 20.

## १) प्रस्तावना : स्त्री विकास आढावा:-

प्राचीन भारतीय समाजात महिलांचे स्थान महत्वाचे होते. शेतीचा शोध त्यांनीच लावला आणि मानवाच्या शिकारी अवस्थेला प्रगत जीवन पध्दतीकडे नेण्याचे श्रेय महिलानांच आहे. स्त्री सत्ताक समाज स्त्रीपुरुष समानतेवर आधारीत होता. पूढे शेती उत्पादनात पुरुषांनी पशुचा वापर वाढविला. यातूनच वर्ण व्यवस्था आणि पुरुषप्रधान व्यवस्था उदयास आली.

ही पुरुष व्यवस्था टिकविण्यासाठीच महिलांना ज्ञान साधनांपासुन परावृत्त ठेवून, पवित्र-अपवित्रतेची परंपरा ही लोकांमध्ये रुजविण्यात आली. अनेकविध धार्मिक परंपरा पूढे करुन पुरुषी वर्चस्व टिकविण्याचा प्रयत्न करण्यात आला. याच काळात जाती ह्या वर्णव्यवस्थेचा प्रभावात आल्या आणि महिला ह्या अत्याचारीत/शोषित बनल्या. देशातल्या विशेषतः महाराष्ट्रातील अनेक समाजसुधारकांच्या प्रबोधनातून, ख्रिच्चन व युरोपियन उदारमतवादामुळे मुलींचे शिक्षण स्वातंत्र्यापूर्वी सुरु झाले. स्त्री शिक्षणाबरोबरच विधवा विवाह, बालविवाह बंदी या सुधारणावादाचा पुरस्कार व प्रसार वाढला. स्त्रीयांच्या मुलगामीत्वावर पुनर्विचार झाला. अनेक संस्था,अनेक कायदे त्यासाठी पूढे झालेत. (शारदा कायदा, कुटुंब न्यायालय कायदा, सतीबंदी कायदा, बालविवाह बंदी कायदा, इ.)

आज भारतीय स्त्रीयांमध्ये झालेल्या बदलांकडे पाहिल्यास त्यांची स्थिती पूर्वीपेक्षा सुधारली आहे पण तरीही ती इतर देशांच्या तुलनेत अद्याप खुपच कमी आहे. महिला आर्थिकदृष्ट्या आजही परावलंबी आहेत. त्यातूनच समाजातील कौटुंबिक हिंसाचार आणि लैगिंक शोषण वाढते आहे. 'मुलगाच हवा व स्त्री ही पुरुषाची मालमत्ता' ही समजुत आज २१ व्या शतकातील भारतीय मानसिकतेतून फारशी कमी झालेली नाही. हुंडाबळी होतच आहेत.

सारांश नैतिकतेचे मापदंडही समाजात प्रचलीत आहेत. भूतकालीन स्त्रीपेक्षा सध्या स्त्रीचा दर्जा उंचावला आहे. तो अधिक उंचावण्यासाठी त्या सनदशिर मार्गाने विविध क्षेत्रात-विविध स्थरावर लढत आहेत. आर्थिक स्वावलंबनासाठीच शासकिय व अशासकीय क्षेत्रात ३३ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. हा अत्यंत त्रोटक आढावा स्त्री दर्जा विकासाचा सांगता येईल.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016

## २) कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या :-

१) स्ट्रॉसच्या मते, 'हिंसाचारातून दुखापत करण्याची क्षमता म्हणजे कौटुंबिक हिंचाचार होय,'

२) गिडीन्स व अँथनी म्हणतात,'कौटुंबिक हिंसाचार म्हणजे कुटुंबातील एका सदस्याने दुसऱ्या एक किंवा अनेक व्यक्तींच्या विरोधात केलेला शारिरीक दुरुपयोग होय.'

## ३) कौटुंबिक हिंसाचाराची व्याप्ती :-

२००५ मध्ये केंद्रसरकारने महिलांचे कौटुंबिक हिंचारापासून संरक्षण करण्यासाठी कायदा संमत केला. या कायद्यानुसार कौटुंबिक हिंचाचारात स्त्रीच्या पतीने किंवा इतर नातेवाईकांनी 'लिव्ह इन रिलेशनशिप' तत्वानुसार एकत्र राहणाऱ्या स्त्री पुरुषांपैकी कुठल्याही नातेवाईकांनी शारीरिक, लैगिंक व आर्थिक छळ करण्याच्या कृतीचा समावेश होतो.

### कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरुप :-

१) शारीरिक छळ म्हणजे मारहाण (लाथा-बुक्क्यांनी) किंवा दुखापत करणाऱ्या प्रकारांचा समावेश होतो.

२) लैगिंक अत्याचारात इच्छेविरुध्द/जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवणे, अश्लिल फोटो काढणे इ.चा समावेश होतो.

३) मानसिक अत्याचारात वाईट बोलणे, अपमानीत करणे, चारित्र्यावर संशय घेणे, घरात बंदिस्त करणे, इ. प्रकारांचा समावेश होतो.

४) आर्थिक अत्याचार प्रकारात हुंड्याची मागणी करणे, तीच्याकडील स्त्रीधन व पैसे काढून घेणे अन्न औषधी न देणे, इ. चा अंतर्भाव होतो.

## ४) संशोधन कर्त्याने केलेल्या अध्ययनातील वस्तुस्थिती :-

### ४.१) निवेदिक महिलांची शैक्षणिक माहिती

| अ.क्र. | शैक्षणिक पार्श्वभुमी | प्रमाण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक | १३ | २६% |
| २ | माध्यमिक | १८ | ३६% |
| ३ | उच्च माध्यमिक | ११ | २२% |
| ४ | पदवीधर | ०५ | १०% |
| ५ | अशिक्षित | ०३ | ०६% |
| | एकुण | ५० | १००% |

समाजात असा समज आहे की, अशिक्षित महिलांवर कौटुंबिक हिंसाचार जास्त होतो. पण वरील सारणीत

माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या महिलांवरच अत्याचार जास्त होतांना दिसतात. पदवीधर महिलांवरही अत्याचारचे प्रमाण आहेच. शिक्षणामुळे अन्यायाविरोधात चीड निर्माण झाली पाहिजे किंवा न्याय मागता येणे अपेक्षित आहे. पण येथे घराची/आपल्या कुटुंबाची प्रतिष्ठा महिलांना महत्वाची वाटते असे दिसते. अत्याचारी कुटुंबाला मात्र ही संवेदना नसल्याचे दिसते. हिंसाचाराचे हे प्रमाण महिलांच्या २० ते ३५ वयोगटातच जास्तीचे (९६%) दिसते. या महिलांमध्ये ६०% गृहिणी आहेत तर मजुरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण ३२% आहे.

**४.२) निवेदिक महिलांचा धर्म दर्शविणारा तपशिल.**

| अ.क्र. | वयोगट | प्रमाण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदु | ३० | ६०% |
| २ | मुस्लीम | ०६ | १२% |
| ३ | बौध्द | १४ | २८% |
| ४ | इतर | ०० | ००% |
| | एकुण | ५० | १००% |

सदरच्या संशोधनात कौटुंबिक हिंसाचारीत महिलांची धर्मवार विगतवारी म्हणजे हिंदु धर्मात सर्वाधिक ६०% तर मुस्लीम धर्मात फक्त १२% आढळली. हिंदु लोकमनावरील पारंपारीक संस्कारही या प्रमाणातून स्पष्ट होतो. तसेच कोणता धर्म स्त्री पुरुषाच्या बाबतीत खऱ्या अर्थाने जास्त समन्यायी व सुधारलेला तेही त्यातून स्पष्ट होण्यास मदत होते.

वरील महिलांना कुटुंबात विविध समारंभामध्ये मानसन्मान मिळतो का? विचारले असता हो म्हणणाऱ्यांचे प्रमाण ५२% व नाही म्हणणाऱ्या महिला ४८% आहेत. म्हणजेच समाजात दांभिकता तर दिसतेच (५२%) पण त्याचबरोबर पुरुषी अहंकाराचे प्रमाणही (४८%) वाढताना दिसते.

**४.३) निवेदिकांचे जात संवर्ग दर्शविणारी सारणी.**

| अ.क्र. | जातसंवर्ग | प्रमाण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | २० | ४०% |
| २ | अनुसुचित जमाती | ०५ | १०% |
| ३ | भटके विमुक्त | ०३ | ०६% |
| ४ | खुला गट | १२ | २४% |
| ५ | इतर मागासवर्गीय | १० | २०% |
| | एकुण | ५० | १००% |

संशोधनात खुल्या जाती संवर्गात २४%, इतर मागासवर्गीयात २०%, तर अनुसुचित जातीमध्ये ४०% (सर्वाधिक) हिंसाचाराचे प्रमाण दिसते. मुस्लीम, आदिवासी आणि भटक्या जमाजात हे प्रमाण कमी दिसते. हिंसाचार जास्त असलेल्या जातींमध्येच शिक्षण व नोकऱ्यांचे प्रमाणही जास्त दिसते. म्हणजे शिक्षणामुळे समाजवर्तनात सुधारणा होत नाही हेही स्पष्ट होते.

४.४) निवेदिकांचा मुख्य व्यवसाय दर्शविणारी सारणी.

| अ.क्र. | तपशील | प्रमाण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेती | ०६ | १२% |
| २ | मजुरी | ३६ | ७२% |
| ३ | नोकरी | ०५ | १०% |
| ४ | व्यापार | ०२ | ०४% |
| ५ | इतर | ०१ | ०२% |
| | एकुण | ५० | १००% |

संशोधनात आर्थिक जबाबदारी पुरुषावर ६२% तर महिलाही १८% स्विकारुन आहेत. महिलांना कामावर जाण्यासही निर्बंधने /बंदी काही प्रमाणात आढळली. थोडक्यात आर्थिक परावलंबीत्व हे हिंसाचाराचे कारण दिसते. हिंसाचारीत महिला ह्या शेती (१२%), मजुरी (७२%), नोकरी (१०%) व व्यवसाय (४%) करणाऱ्या अशा सर्वच क्षेत्रातील आहेत.

वरील कुटुंबामध्ये शिक्षण व कौशल्याची कमतरता असल्याने मजुरी करणाऱ्या स्त्रीयांची संख्या जास्त आहे. अशा कुटुंबातील सदस्यांना उत्पन्न वाढीस उपयुक्त अशा कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रमांचा शिक्षण धुरीणांनी- नियोजक व शासन कर्त्यांनी किंबहुना जास्त तर शिक्षण अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांनी केली पाहिजे. पण शिक्षणातही दांभिकपणाच मोठ्या प्रमाणावर दिसतो. या अभ्यासक्रमांसाठी संसाधने/पैसा कमी निश्चितच नाही असे शासनाच्या अंदाजपत्रकीय तरतुदींवरुन तरी स्पष्ट होते.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016

४.५) निवेदिकांमधील लैंगिक छळाचे प्रमाणदर्शक तपशील.

| अ.क्र. | तपशील | प्रमाण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शारीरिक संबंध जबरदस्तीने करणे | १३ | २६% |
| २ | अश्लिल शिविगाळ करणे | २१ | ४२% |
| ३ | ब्ल्यु फिल्म पाहण्याची सक्ती करणे | ०० | ००% |
| ४ | संबंधात मारहाण करणे | ०४ | ०८% |
| ५ | इतर | ०० | ००% |
| ६ | उत्तर न आलेले | १२ | २४% |
| | एकुण | ५० | १००% |

संशोधकाने लैंगिक छळाबाबत विचारणा केल्यावर मनाला सुन्न करणारे निष्कर्श जाणवले. त्यात जबरदस्तीने शारीरिक संबंध करणे, अश्लिल शिविगाळ करणे, इ. चे प्रमाण अनुक्रमे २६% व ४२% इतके दिसले.

२४ % महिलांनी उत्तरेच दिली नाहीत याचा अर्थ पुरुषी/सांस्कृतिक दहशतीचाच हा प्रकार आहे. बाहेरच्या दहशतवादाला बळाच्या प्रत्युत्तराने मोडून काढणे शक्य आहे पण समाजातील सांस्कृतिक/कौटुंबिक दहशतवाद मोडून काढण्यासाठी ठोस प्रयत्न विशेषत: पुरुषांनीच करण्याची गरज आहे. महिलांसाठीच्या संस्था-संघटनाही अनेकदा महिला सक्षमता,(Women Empowerment), महिला समानता (Women Equality) निर्मितीसाठी महिला/मुलींमध्येच जास्त काम करतांना दिसतात. माझ्या मते संस्था-संघठनांच्या या कार्यक्रमांची सुध्दा दिशा बदलून पुरुषांमध्ये/मुलांमध्ये विशेषत: अशा दृष्टीकोन निर्मितीसाठीच्या ठोस कार्यक्रमांची आवश्यकता एक कार्यकर्ता म्हणून संशोधकास तीव्रतेने वाटते.

४.६) निवेदिकांच्या कुटुंबात छळ करणारे घटक.

| अ.क्र. | तपशील | प्रमाण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सासु-सासरे | १३ | २६% |
| २ | पती | ३३ | ६६% |
| ३ | इतर नातेवाईक | ०३ | ०६% |
| ४ | माहेरी | ०० | ००% |
| ५ | वरील सर्व | ०७ | १४% |
| | एकुण | ५० | १००% |

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016

महिलांवर कुटुंबात छळ करणाऱ्यांमध्ये नवरा स्वत: ६६% तर सासु-सासरे २६% आणि इतर नातेवाईकांचा वाटा ६% आहे. सारांश म्हणजे या महिला ज्यांच्या विश्वासावर विवाहानंतर नवीन घरात येते तेच सर्वजण तीच्या विश्वासावर आघात करतांना दिसतात.

हिंसाचाराचे स्वरुप विचारल्यावर पुढील वास्तव समोर आले. ते म्हणजे शारीरिक ६०%, मानसिक ५४%, लैगिंक ४%, सामाजिक ८%, तर इतर प्रकारे १०%, इ. शारीरिक व मानसिक छळाचे प्रमाण सर्वाधिक असून हि प्रवृत्ती/मनोवृत्ती काम करणाऱ्या महिलांची कृतिशिलता व काम करण्याची मानसिकता खचवणारी आहे.

या शारीरिक हिंसाचारात मारहाण(लाथा,बुक्के) -तोंडात, पोटात इ. चा समावेश आहे. सामाजिक हिंसाचारात महिलांना घरातच बंदिस्त करुन ठेवणे, सार्वजनिक ठिकाणी अपमानीत करणे, सामुदायिक कार्यक्रमात सहभागी (८%) होवू न देणे, इ. प्रकारांचा समावेश आहे. मानसिक हिंसाचारात संशयी वृत्ती, (३४%), शिवीगाळ करणे (३०%), अपमानास्पद बोलणे (३८%), इ. प्रकारांचा अंतर्भाव आहे.

**४.७) निवेदिकांवर छळ झाल्यास त्यांच्याकडून केली जाणारी कृती.**

| अ.क्र. | तपशील | प्रमाण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सहन करणे | ३६ | ७२% |
| २ | प्रतिकार करणे | ०२ | ०४% |
| ३ | माहेरी निघून जाणे | ०९ | १८% |
| ४ | कायद्याची मदत घेणे | ०१ | ०२% |
| ५ | शेजाऱ्यांची मदत घेणे | ०२ | ०४% |
| ६ | इतर | ०० | ००% |
| | एकुण | ५० | १००% |

महिलांचा छळ झाल्यास त्यांच्याकडून केली जाणारी कार्यवाही पुढील प्रमाणे आहे. हिंसाचार सहन करणे ७२%, माहेरी निघून जाणे १८%, प्रतिकार करणे/शेजारची मदत घेणे ८%, कायद्याची मदत घेणाऱ्यांची संख्या सर्वात कमी म्हणजे २% आहे. हा सर्वच परिणाम सांस्कृतिक संस्कारांचा आहे हे अमान्य करता येणार नाही. या कौटुंबिक हिंसाचाराचा अतिरेक झाल्यास आत्महत्येचा विचार ५८% (सर्वाधिक) महिलांच्या मनात येतो. कायद्याची मदत घेण्याचा विचार फक्त १२% महिलांना वाटतो. अणि उर्वरित महिला मात्र माहेरी जाणे (१४%) व मानसिक ताण-तणावातच जगणे (१८%) पसंत करतात.

महिलांनी कायद्याचा विचार अगत्याने करुन न्याय मागणे आणि त्यांच्या मनात येणाऱ्या आत्महत्त्येच्या विचारांबाबतचा दृष्टीकोन बदलाची जबाबदारी संबंधीत महिलांची आणि सांस्कृतिक/धार्मिक ठेकेदारांची आहे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016

### ४.८) महिलांवरील या कौटुंबिक हिंसाचारात माहेरच्यांची भूमिका.

| अ.क्र. | तपशील | प्रमाण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्वत:ला समजावणे | २० | ४०% |
| २ | सासरच्यांची समजूत | ०६ | १२% |
| ३ | कायद्याची मदत | २४ | ४८% |
| ४ | इतर | ०० | ००% |
| | एकुण | ५० | १००% |

कौटुंबिक हिंसाचारात माहेरच्या मंडळींचाही टोकाच्या परिस्थितीतच कायद्याचा आधार घेण्याचा विचार असतो, तोही फक्त ४८% कुटुंबाचा. बाकी सर्व संबंधीत अत्याचारीत महिलेलाच समजावतात (४०%) तर १२% सासरच्यांचीच समजूत घालण्याचा प्रयत्न करतात.'कायद्याचे अज्ञान' असेही म्हणता येत नाही कारण कायदा माहित आहे म्हणणाऱ्या महिलांचे प्रमाणही ८०% दिसते. म्हणजेच कायदा माहिती आहे पण तो नेमका काय, त्याचे स्वरुप व त्यासाठीच्या यंत्रणेची माहिती आहे असे वाटत नाही. कायदा व न्यायसाक्षरताही महिलांमधील/समाजातील वाढली पाहिजे. आर्थिक स्वावलंबन व कायदेशिर न्याय मागण्याची हिंमत-प्रवृत्ती-मानसिकता महिलांमध्येच निर्माण करण्याची अत्यावश्यकता आजच्या काळात वाटते. तसे मानसिक सक्षमीकरण महीलांचे केले पाहिजे. अशा परिस्थितीत सभोवतीच्या कोणत्याही स्थानिक संस्थाही मदत करीत नाहीत हेही वास्तव स्पष्ट झाले.

### ४.९) कायदेशीर मागणीत येणाऱ्या अडचणी दर्शविणारी सारणी.

| अ.क्र. | तपशील | प्रमाण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कुटुंबाचा दबाव | ११ | २२% |
| २ | समाजाची भिती | १४ | २८% |
| ३ | प्रतिष्ठेचा विचार | १९ | ३८% |
| ४ | इतर | ०० | ००% |
| ५ | उत्तर न आलेले | ०८ | १६% |
| | एकुण | ५० | १००% |

कौटुंबिक हिंसाचारात केस नोंदविल्याने आपली कौटुंबिक प्रतिष्ठा धोक्यात येईल हीच पारंपारीक धारणा सर्वाधिक महिलांमध्ये म्हणजे ३८% दिसली. समाजाची भीती आणि कुटुंबाचा दबाव हा अनुक्रमे २२% व २८% दिसला. हिंसाचाराच्या कायदेशीर नोंदणीबाबत उत्तर न देणाऱ्या महिलांची संख्याही १६% दिसली. पण महिलांच्या व समाजाच्याच दृष्टीकोनात बदल करण्याची गरज जास्त आहे. या जाचक व अवैज्ञानिक पंरपरांचा अभिमानही संपवण्याची मुख्यत: गरज आहे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016

## ५) संशोधनात आढळलेली कौटुंबिक हिंसाचाराची कारणे ठळक निरिक्षणे व परिणाम :-

जळगाव शहर आर्थिक व शैक्षणिक संस्थांचे म्हणजेच विकासाचे जिल्हाकेंद्र आहे. याच शहरातील गंभीर वास्तव मांडण्याचा प्रयत्न मी या संशोधनपर लेखात केला आहे.

- कौटुंबिक हिंसाचाराची कारणे-

  * पुरुषप्रधान संस्कृती * आर्थिक परावलंबन * व्यसनाधिनत * गरीबी * हुंडाबळी * पुरुषांची संशयी प्रवृत्ती,
- तसेच हिंदु धर्मातील खुल्या संवर्गातील व इतर मागासवर्गीय जातींचा तसेच बौध्द धर्मीय अनुसुचित जातीच्या पुरुषांचा मुख्यत: या हिंसाचार करणाऱ्यांमध्ये समावेश सर्वाधिक दिसुन आला.
- अनुसुचित जमाती आणि विशेषत: मुस्लीम धर्मीय जातींमध्ये हिंसाचाराचे व हिंसाचार करणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प दिसले.
- कोणत्या जाती/धर्म खऱ्या अर्थाने सुधारीत आणि कोणत्या दांभिक व सांस्कृतिक दहशतवादी हेही यातून स्पष्ट झाले. सामाजिक संस्थाही दांभिक - मदतीसाठी पूढे येत नाहीत.
- कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा अत्यल्प सहभाग.
- कायद्याची माहिती आहे पण कृतीशिलता नाही. बेगडी/खोट्या कौटुंबिक प्रतिष्ठेची भीती.
- हिंसाचारातून सर्वाधिक महत्वाचा परिणाम म्हणजे पती-पत्नी मध्ये वाढलेला मतभेद. त्यातून त्या दोघांमधील मनभेद हे कुटुंबाच्या निकोप विकासाला मारक आहे.
- कुटुंबांच्या आर्थिक/सामाजिक स्थितीवरही परिणाम संभवतात.
- सासु-सासरच्या नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो. वाढतो.
- या सर्वांचा परिणाम कुटुंबाच्या स्थैर्यावर, मुलांच्या संगोपन व शिक्षणावर दूरगामी स्वरुपाचे होतात.
- पोलीस यंत्रणेकडून होणारे आर्थिक व मानसिक शोषण, सामाजिक प्रतिष्ठेस धक्का कुटुंबाचे विघटन, दोन्ही कुटुंबातील सदस्यांचे मानसिक-सामाजिक-आर्थिक स्वास्थ्य ढासळणे.

## ६) कौटुंबिक हिंसाचार मुक्त समाजासाठी उपाययोजना :-

देशाच्या एकुण लोकसंख्येच्या ५०% लोकसंख्या असलेल्या महिलांना न्याय मिळण्याची आज नितांत गरज आहे. त्यांना खऱ्या अर्थाने सामर्थ्यशाली समता-क्षमता देवूनच डॉ.अब्दुल कलामांच्या स्वप्नातील सामर्थ्यशाली भारत निर्माण करण्याच्या प्रक्रियेस गती-वास्तव रुप देता येईल. त्यासाठी पुढील उपाययोजना संशोधनकर्त्यास महत्वाच्या वाटतात.

१) पुरुषांनी व विशेषत: महिलांनी स्वत: अवैज्ञानिक व लिंगभेदाचे मूळ असलेले पारंपारिक सांस्कृतिक/धार्मिक दृष्टीकोन बदलण्याची झुगारण्याची गरज आहे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – I June 2016

२) महिलांबाबतचा दृष्टीकोन बदलासाठी धार्मिक-कौटुंबिक व्यवस्थेने न्यायासाठी-हिंसाचार कमी करण्या वा रोखण्यासाठी कायदेशीर तरतुदींचा अवलंब करण्याबाबत महिलांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

३) स्वयंसेवी संस्था, शिक्षण संस्था, विद्यापीठे, शासन यांनी हिंसाचार मुक्त समाज निर्मितीसाठी, महिलांच्या खऱ्या सन्मान व सक्षमीकरणासाठी ठोस व रोखठोक स्वरुपाचे जाणीव जागृती -लोकशिक्षणाचे उपक्रम महिलांमध्ये विशेषत: मुलांमध्ये/पुरुषांसाठी राबविण्याची गरज प्राधान्याने आहे. हे उपक्रम राबवितांना संयमी भाषा पण निर्णायक आत्मविश्वास कृतीशील घटकांनी ठेवला पाहिजे. केवळ आक्रस्थाळेपणा करुन हा प्रश्न सुटणार नाही, त्याचा उलट परिणाम मात्र होऊ शकतो.

४) धर्मवादी/सांस्कृतिक ठेकेदारांनीही खऱ्या अर्थाने समतेची -विज्ञानवादी भूमिका घेण्याची गरज आहे.

५) शालेय, महाविद्यालयीन-विद्यापीठीय अभ्यासक्रमांमध्ये विविध विषयांमध्ये गरजेनुसार महिलांना दुय्यमत्व देणारे, शारीरिक व भावनिक ब्लॅकमेल करणाऱ्या, सांस्कृतिक, खोट्या प्रतिष्ठांना खतपाणी घालणाऱ्या भावनाप्रधान लेखन साहित्याला, माध्यमातील प्रवृत्तींना हद्दपार केले पाहिजे. याउलट न्याय्य-समतावादी, वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणारे, कायदेशिर हक्कांच्या उपयोग करण्यास प्रोत्साहक-मनोधैर्य-आत्मविश्वास वाढविणारे लेखन-साहित्य अभ्यासक्रमात जाणीवपूर्वक अंर्तभूत केले पाहिजे.

६) कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत महिलांना स्थान व महत्व देण्याची गरज आहे.

७) महिला/एकुण समाजतंत्र कायदा साक्षरता तपशीलवाराने विकसीत करण्याची गरज आहे.

८) स्त्रीवादी चळवळींनी महिलांच्या आर्थिक स्वावलंबनावर भर देण्याची आवश्यकता.

९) कौटुंबिक हिंसाचाराच्या माहिती/न्यायासाठी/सहकार्यासाठी हेल्पलाईन (शासकीय/खाजगी) गरजेची.

१०) कौटुंबिक हिंसाचारातून खचलेली मानसिक स्थिती व मानसिक ताणतणाव घालविण्यासाठी समुपदेशन केंद्रांची निर्मिती महत्वाची. प्रशिक्षण व स्त्रीयांप्रती सकारात्मक दृष्टीकोन असलेले समुपदेशकही असणे महत्वाचे.

११) शिक्षक-सामाजिक मान्यता असणाऱ्यांचा दृष्टीकोन बदलाची नितांत गरज-शाळा महाविद्यालयांमधून महिला सक्षमीकरण/दृष्टीकोन शिकविणाऱ्यांचा दृष्टीकोन सकारात्मक ठेवण्याची नितांत गरज आहे. शिक्षक/प्राध्यापकांचाच दृष्टीकोन पारंपारीक असेल, तो स्वच्छ व वैज्ञानिक, समतावादी नसेल तर हिंचारमुक्ती ऐवजी गोंधळातच भर पडेल यात शंका नाही.

## ७) संशोधन लेखाचे विश्व, संशोधन पध्दती व मर्यादा:-

या संशोधन लेखाचा आराखडा तयार करतांना जळगाव शहरातील शिवाजीनगर, गेंदालाल मील व कांचन नगर या वस्त्यांमधील केवळ ५० हिंसाचारग्रस्त महिलांच्या मतांचे सर्वेक्षण केले आहे. या महिलांची माहिती महिला बालसहाय्य कक्ष, महिला दक्षता समितीकडून मिळविली असुन २००९ ते २०१४ या कालावधीत कौटुंबिक हिंसाचारामुळे बाधीत या महिला होत्या. या संशोधनासाठी सोयिस्कर नमुना निवड पध्दतीचा उपयोग केला.

मुलाखत अनुसूचितव्दारे तत्थे संकलन करुन संख्यात्मक व गुणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब विश्लेषणासाठी केला आहे.

## ८) संशोधनाच्या मर्यादा :-

सेमिनार/कॉन्फरन्सेसमध्ये वास्तवाधिष्ठित सांख्यिकी माहिती व अध्ययनावर उपयोजित लेखन करावे या हेतूने हा छोटासा प्रयत्न केला आहे. त्यात अनेक मर्यादा आहेत. काही पुढीलप्रमाणे-

१) निवेदक महिलांचा सुरुवातीस माहिती देण्यास नकार, कालांतराने तयारी.

२) वर्षानुवर्षांच्या कौटुंबिक संस्कारापुढे शिक्षण/प्रेरणा निष्प्रभ झाले.

३) महिलांना समाजाची/कुटुंबातील सदस्यांचीही भिती होती.त्यामुळे मिळणारी माहितीही बाधीत आहे.

४) केवळ ५० महिला निवेदिकांच्या आधारे विश्वाचा निष्कर्ष, परिणाम, उपायोजना स्वत:च्या डोळस अध्ययन/अनुभवाआधारे मांडल्या आहेत.

## ९) संदर्भ सूची :-

१) ॲड. असिम सरोदे 'कौटुंबिक हिंसाचार कायदा व संरक्षण २००५', मनोविकास प्रकाशन, पुणे (२००७)

२) साखरे, सीमा डॉ, 'स्त्रीयांच्या न्यायाचा प्रश्न', सीमा प्रकाशन, नागपूर (२००४)

३) पाटील, लिला, डॉ, 'भारतीय स्त्री जीवन', मेहता पब्लीकेशन, पुणे, (१९९०)

४) गुप्ते मनिषा व मोरे अर्चना, 'चक्रभेद', मासुम प्रकाशन पुणे, (२००७)

५) महिला व बाल सहाय्य कक्ष माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन

६) स्थानिक वर्तमानपत्रे

७) स्वत:ची समाजातील २५ वर्षातील निरिक्षणे